# आदिवासी योजनांचा कातक-यांना झालेल्या लाभाचे अध्ययन (विशेष संदर्भ : कर्जत तालुका, जि. रायगड)

**अविनाश बाजीराव कोष्टी**
पीएच.डी. संशोधक विद्यार्थी
प्रा. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय, आकुर्डी, पुणे - 44
ईमेल : avinashkoshti@gmail.com

**डॉ. बी. जे. लोबो**
पीएच.डी. मार्गदर्शक
प्रा.रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय, आकुर्डी, पुणे

---

**गोषवारा :**

भारतातील विविध राज्यांतील आदिवासी जमातीतील काही पोटजाती जंगलात वास्तव्यास आहेत तर काही आदिवासी जमाती समूहाने वस्ती करुन राहत असल्याचे दिसतात. महाराष्ट्राचा विचार केला असता महाराष्ट्रात आदिवासी जमातीमध्ये गोंड, कोकणा, भिल्ल, महादेव कोळी, वारली, कातकरी, ठकार इत्यादी जमातींचे अस्तित्व असल्याचे दिसते. भारतात 2011 च्या जनगणनेनुसार आदिवासींची लोकसंख्या 10,42,81,034 कोटी इतकी असून महाराष्ट्राचा विचार केला असता 2011 च्या जनगणनेनुसार आदिवासींची लोकसंख्या 105.10 लाख असून त्यापैकी कातकरी जमातींची लोकसंख्या 2,85,334 इतकी दिसून येते. कातकरी हा शब्द कात किंवा काथ आणि करी म्हणजे करणे या मराठी शब्दापासून तयार झालेला असावा. कातकरी म्हणजे कात, काथ तयार करणारे कातकरी, काथोडी, काथकरी व काथोडिया या नावानेसुद्धा ओळखले जातात. कातकरी जमातीतील लोक जंगलातील वाळलेली लाकडे, फळे, कंदमुळे, फुले इत्यादींची विक्री करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. महाराष्ट्रातील कातकरी जमात तशी विकासापासून दुर्लक्षित जमात म्हणून ओळखली जात असून कातकरी जमातींच्या लोकांचा आर्थिक व सामाजिक विकास झालेला दिसून येत नाही. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा वापर करण्यात आला असून आदिवासींसाठी राबविलेल्या शासनाच्या योजना, कातक-यांना मिळालेल्या शासकीय योजनांच्या लाभाचा आढावा घेणे या उद्दिष्टांच्या आधारे आदिवासी योजनांचा कातक-यांना झालेल्या लाभाचे अध्ययनाचा सविस्तर आढावा घेतलेला आहे.

**महत्त्वाचे शब्द :** आदिवासी, कातकरी, जमात, महाराष्ट्र, शासकीय योजना इ.

---

**प्रस्तावना :**

भारतातील विविध राज्यांतील आदिवासी जमातीतील काही पोटजाती जंगलात वास्तव्यास आहेत तर काही आदिवासी जमाती समूहाने वस्ती करुन राहत असल्याचे दिसतात. महाराष्ट्राचा विचार केला असता महाराष्ट्रात आदिवासी जमातीमध्ये गोंड, कोकणा, भिल्ल, महादेव कोळी, वारली, कातकरी, ठकार इत्यादी जमातींचे अस्तित्व असल्याचे दिसते. भारतात 2011 च्या जनगणनेनुसार आदिवासींची लोकसंख्या 10,42,81,034 कोटी इतकी असून महाराष्ट्राचा विचार केला असता 2011 च्या जनगणनेनुसार आदिवासींची लोकसंख्या 105.10 लाख असून त्यापैकी कातकरी जमातींची लोकसंख्या 2,85,334 इतकी दिसून येते. आदिवासींच्या कल्याणाच्या योजनांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी 1972 मध्ये समाजकल्याण विभागांतर्गत आदिवासी विकास संचलनालयाची स्थापना करण्यात आली होती. त्यानंतर 1976 साली आदिवासी विकास आयुक्तालय सुरु करण्यात आले. दि. 22 एप्रिल 1983 रोजी स्वतंत्र आदिवासी विकास विभागाची स्थापना

करण्यात आली आणि 1984 पासून आदिवासी विकास विभाग स्वतंत्रपणे कार्यरत आहे. आदिवासी विकास विभागाच्या बळकटीकरणाकरिता 1992 मध्ये आदिवासी विकास संचालनालय हे आदिवासी विकास आयुक्तालयात विलीन करण्यात आले. केंद्र व राज्य शासनाच्या आदिवासींसाठी असणा-या योजनांचा कातक-यांना झालेल्या लाभाचा सविस्तर आढावा प्रस्तुत शोधनिबंधामध्ये घेतला आहे.

**कातकरी अर्थ :**

कातकरी हा शब्द कात किंवा काथ आणि करी म्हणजे करणे या मराठी शब्दापासून तयार झालेला असावा. कातकरी म्हणजे कात, काथ तयार करणारे कातकरी, काथोडी, काथकरी व काथोडिया या नावानेसुद्धा ओळखले जातात. कात तयार करणे हा जुन्या काळी कातक-यांचा मुख्य व्यवसाय होता आणि त्यावरुनच त्यांना कातकरी हे नाव पडले आहे.

**उद्दिष्टे :**

1. आदिवासींसाठी राबविलेल्या शासनाच्या योजनांचा आढावा घेणे.
2. कातक-यांना मिळालेल्या शासकीय योजनांच्या लाभाचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेल्या कर्जत तालुक्यातील कातकरी जमातीतील कुटुंबांची निवड करताना नमुना निवडीच्या विविध पद्धतीपैकी सोयीस्कर किंवा सुविधाजनक नमुना (**Accidental or Convenience Sampling**) निवड पद्धतीचा वापर केला आहे. सन 2011 च्या जनगणनेनुसार कर्जत तालुक्यात एकूण 185 गावे आहेत. कर्जत तालुक्यातील एकूण 101 गावांमध्ये कातकरी जमातीची लोकसंख्या असून अभ्यासासाठी 101 गावांपैकी 15 (54.59 टक्के) गावांची नमुना निवड केली असून या 15 गावांमध्ये कातकरी कुटुंबांची एकूण संख्या 1307 इतकी असून त्यापैकी 654 (50.04 टक्के) कुटुंबांची निवड केली असून, 15 गावातील एकूण कातकरीपैकी 50.00 टक्के कुटुंबांची निवड करुन सर्व कातकरी जमातीच्या कुटुंबांना समान न्याय दिला आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये पुस्तके, अहवाल, संकेतस्थळे इत्यादीचा वापर केला आहे.

**आदिवासींसाठी राबविलेल्या शासनाच्या योजना :**

सरकारने आदिवासींचा आर्थिक व सामाजिक विकास होण्यासाठी विविध योजना सुरु केल्या असून त्याचा लाभ आदिवासींमधील सर्वच जमातींना होताना दिसून येतो.

**खावटी कर्ज योजना :**

खावटी कर्ज योजना 2012-13 पासून ओटीएसपी मध्ये सुरु झाली. 1995 पासून टीएसपी मध्ये सुरु होती. महाराष्ट्र राज्य आदिवासींची आर्थिक स्थिती (सुधारणा) आधिनियम 1176 च्या तरतुदीनुसार आदिवासी उपयोजना क्षेत्रातील विशिष्ट घटकांकडून आदिवासी बांधवांची होणारी परंपरागत पिळवणूक व शोषण थांबविण्याकरिता व पावसाळ्यामध्ये उपासमार होऊ नये म्हणून शेत मजूर व अल्पभूधारक 04 यूनिट पर्यंतच्या कुटुंबांना प्रत्येकी रुपये 2000, 08 यूनिट करिता रुपये 3000 व त्यावरील कुटुंबांकरिता रुपये 4000 प्रमाणे खावटी कर्ज वाटप करण्यात येते. यामध्ये 90 टक्के धन्य रुपाने व 10 टक्के रोख स्वरुपात लाभ देण्यात येतो.

**विशेष केंद्रीय सहाय्य योजना :**

विशेष केंद्रीय सहाय्य योजना 2003-04 पासून सुरु झालेली आहे दरिद्रय रेषेखालील अनु. जमातीच्या कुटुंबासाठी विशेष सहाय्य योजनेंतर्गत खालील प्रमाणे योजना राबविण्यात येतात, योजनेंतर्गत राबविण्यात येणा-या विविध योजना केंद्र सरकार निधीतून राबविण्यात येतात घरकुल योजना (रुपये 100,000 मर्यादा), विट भट्टी व्यवसाय, दूधाळ जनावरे पुरवठा (दोन गायी/म्हशी), भाजीपाला किटचे वाटप, गांडूळ खत निर्मिती करणे, लघु उपसा सिंचना योजना राबविणे, सिंचनासाठी नविन विहीर खोदून देणे, शिलाई मशिंनचे वाटप तसेच इलेक्ट्रोनिक पार्टची जुळणी करण्याचे प्रशिक्षण देणे, वराह पालन, कुक्कुटपालन आशा विविध प्रकारच्या योजना राबविण्यात येतात. इंडो जर्मन ट्रल्स व सिपेट या केंद्र शासन अंगीकृत संस्थामधून 100 टक्के जॉब गरन्टीवर आदिवासी युवक युवतीना प्लास्टिंग मोल्डिंग, प्रोसेसिंग इत्यादीचे प्रशिक्षण देण्यात येते.

**अनु. जमातीच्या कुटुंबाकरीता घरकुल योजना योजना :**

अनु. जमातीच्या कुटुंबाकरिता घरकुल योजना योजना 2003-04 पासून सुरु झालेली आहे. दारिद्र्य रेषेखालील अनु. जमातीच्या कुटुंबना निवाराकारिता घरकुल बांधकाम करुन देण्यात येते. रुपये 1,00,000 चे मर्यादेत अनुदान तीन टप्प्यामध्ये लाभार्थ्यांना वितरीत करण्यात येते. ज्यामध्ये लाभाथी स्वत: घरकुलाचे बांधकाम करताना त्यांना कामाची प्रगती पाहून उवरित निधी अदा केला जातो. यासाठी लाभार्थ्याकडे स्वत:च्या मालकीची जागा असणे आवश्यक आहे.

**इंदिरा आवास योजना :**

एप्रिल, 1989 पासून इंदिरा आवास योजना जवाहर रोजगार योजनेची उपयोजना म्हणून राबविली जात होती. दि. 01 जानेवारी 1996 पासून केंद्र शासनाने या योजनेला स्वतंत्र दर्जा दिला असून आता ही योजना राज्यात स्वतंत्ररित्या राबविली जाते. या योजनेच्या निधीच्या उपलब्धतेची पद्धत 75 टक्के केंद्रशासन व 25 टक्के राज्यशासन अशी आहे. दि. 01 एप्रिल 2013 पासून टिकाऊ व मजबूत स्वरुपाची घरे बांधून देण्यासाठी केंद्र शासनाने प्रती घरकुल रक्कम रुपये 70,000 केले असून त्या अनुषंगाने राज्य शासनास (25 टक्के) प्रती घरकुल अनुदान देय ठरते.

**अनु. जमातीच्या कुठुंबाकरीता घरगुती गॉस संचचा पुरवठा योजना :**

2005-06 पासून सुरु झालेली आहे दरिद्र्य रेषेखालील अनु. जमातीच्या कुटुंबाना रुपये 3,000 चे मर्यादेत घगुती गॉस संच पुरवठा करण्यात येतो. यामध्ये वृक्षतोड थांबणे हा उद्देश आहे.

**लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्था :**

केंद्र शासनाच्या किमान सामायिक कार्यक्रमाअंतर्गत गरीबांना केंद्रस्थानी मानून दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना सवलतीच्या दराने अन्नधान्य पुरविण्याची योजना राज्यात दि. 01 जून 1997 पासून सुरु करण्यात आली. दि. 01 एप्रिल 2002 पासून दारिद्र्य रेषेखालील म्हणजे पिवळया शिधापत्रिकाधारकांना दरमहा 35 किलो धान्य (गहू व तांदूळ) व केशरी शिधापत्रिकाधारकांना प्रतिमाह 15 किलो धान्य (तांदूळ व गहू) देण्यात येत होते. दिनांक 1 फेब्रुवारी, 2014 पासून राज्यात राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायद्याची अंमलबजावणी सुरु झालेली आहे. त्यानुसार लाभार्थ्यांचे अंत्योदय गट व प्राधान्य गट असे दोन गट अस्तित्वात आले असून अंत्योदय गटाच्या लाभार्थ्यांस पुर्वीप्रमाणेच प्रतिमाह प्रतिशिधापत्रिका 35 किलो अन्नधान्याचे वाटप करण्यात येते तर प्राधान्य गटाच्या लाभार्थ्यास प्रतिमाह प्रतिव्यक्ती 05 किलो अन्नधान्याचे वाटप करण्यात येते.

**वन हक्क कायदा :**

अनुसूचित जमाती आणि पारंपारिक वन निवासी अधिनियम 2006 वनसंवर्धन अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वनवासी ज्यांच्यासाठी पिढ्यांकरिता अशा जंगलात रहात आहेत अशा वन्य जमिनीतील वन अधिकार आणि व्यवसाय ओळखणे व त्यांचे पालन करणे आहे. अधिनियम दि.31 डिसेंबर 2007 पासून अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती आणि इतर पारंपारिक वनवासी (वन हक्कांचे ओळख) नियम 2008 च्या अंमलबजावणीसाठी कायद्याच्या तरतुदी लागू करण्यासाठी ही सूचना दि. 01 जानेवारी 2008 रोजी अधिसूचित करण्यात आली.

**पशुसंवर्धन कार्यक्रम :**

आदिवासींच्या दृष्टीने पशुसंवर्धन कार्यक्रम हा अतिशय महत्त्वाचा असा कार्यक्रम आहे. आदिवासी क्षेत्रात पशुसंपत्ती मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. पशुधन व म्हशी यांचे प्रमाण आदिवासी क्षेत्रात अनुक्रमे 27 टक्के व 19 टक्के तर शेळ्या मेंढ्यांचे प्रमाण अनुक्रमे 11 टक्के व 22 टक्के आहे. तसेच कुक्कुटसंख्या 25 टक्के दिसते. पशुधन उत्पादनामध्ये वाढ झाल्यामुळे आदिवासी क्षेत्रामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील व त्यामुळे आदिवासींच्या आर्थिक स्थितीमध्ये तसेच पोषण विषयक दर्जात वाढ होण्यास मदत होईल यासाठी पशुसंवर्धन कार्यक्रमाखाली विविध योजना हाती घेण्यात आल्या आहेत.

**कातक-यांना मिळालेल्या शासकीय योजनांच्या लाभाचा आढावा :**

कर्जत तालुक्यातील कातक-यांना आदिवासींसाठी असणा-या कोणत्या शासकीय योजनांचा लाभ मिळाला आहे याविषयी माहिती तक्ता 1.1 मध्ये दिली आहे.

तक्ता 1.1

कातक-यांना मिळालेल्या शासकीय योजनांच्या लाभानुसार वर्गीकरण

| अ.नं. | शासकीय योजना | कातकरी संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | पिवळे रेशनकार्ड | 654 | 100.00 |
| 2 | अंत्योदय योजना | 654 | 100.00 |
| 3 | वैयक्तिक वन जमीन दावे | 68 | 10.40 |
| 4 | घरकुल योजना (गृहबांधणी) | 137 | 20.95 |
| 5 | जातीचा दाखला | 654 | 100.00 |
| 6 | दारिद्र्य रेषेखालील योजना | 93 | 14.22 |
| 7 | आरोग्यविषयक योजना | 43 | 06.57 |
| 8 | पशुसंवर्धन योजना | 21 | 03.21 |
| 9 | घरटान योजना (अतिक्रमण नियमानुकुल योजना) | 194 | 29.66 |
| 10 | संयुक्त वन हक्क दावे | 39 | 05.96 |

स्रोत : क्षेत्रीय पाहणी

टीप : कातक-यांनी बहुपर्यायी उत्तरे दिली असल्याने एकूण 654 संख्येशी बेरीज जुळत नाही.

तक्ता 1.1 वरुन असे दिसून येते की, पिवळे रेशनकार्ड, अंत्योदय योजना, जातीचा दाखला इत्यादी योजनांचा लाभ घेणा-या कातक-यांचे प्रमाण प्रत्येकी 100.00 (654) टक्के दिसून येते. घरटान योजना (अतिक्रमण

नियमानुकुल योजना) व घरकुल योजना (गृहबांधणी) या योजनांचा लाभ घेणा-या कातक-यांचे प्रमाण अनुक्रमे 29.66 (194) टक्के व 20.95 (137) टक्के असून दारिद्र्यरेषेखालील योजना, वैयक्तिक वन जमीन दावे, आरोग्यविषयक योजना आणि संयुक्त वन हक्क दावे या योजनांचा लाभ घेणा-या कातक-यांचे प्रमाण अनुक्रमे 14.22 (93) टक्के, 10.40 (68) टक्के, 06.57 (43) टक्के आणि 05.96 (39) टक्के आहे. तर पशुसंवर्धन योजनेचा लाभ घेणा-या कातक-यांचे प्रमाण 03.21 (21) टक्के दिसते. याचाच अर्थ, अभ्यासासाठी निवडलेल्या शंभर टक्के कातक-यांना पिवळे रेशनकार्ड, अंत्योदय योजना, जातीचा दाखला या योजनांचा लाभ झालेला असून काही कातक-यांना तीनपेक्षा जास्त योजनांचा लाभ झाल्याचे स्पष्ट होते.

**सारांश :**

भारतातील विविध राज्यांत आदिवासी जमातीतील काही पोटजाती जंगलात राहतात तर काही समुहाने पठारावर राहताना दिसतात. महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या द-याखो-यात राहणारी एक आदिवासी वन्य जमात म्हणून कातकरी जमातीची ओळख आहे. कातकरी जमातीची लोकवस्ती रायगड, ठाणे, पुणे व नाशिक जिल्ह्यात केंद्रित झालेली आहे. भारताच्या केंद्र व राज्य सरकारने आदिवासींच्या आर्थिक व सामजिक स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी अनेक आर्थिक व सामाजिक कल्याणाच्या विविध योजना राबविल्या असून त्या योजनांचा लाभ अनेक आदिवासी जमातींना झालेला दिसून येतो असे असले तरी अनेक योजनांची प्रभावी अंमलबजावणी पूर्णपणे झालेली नसल्याने काही आदिवासी जमातींना शासकीय योजनापासून वंचित रहावे लागलेले दिसून येते. प्रस्तुत अभ्यासात रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील कातकरी जमातीतील लोकांना शासनाच्या आदिवासी योजनांचा लाभ झालेला असला तरी आजून ही अनेक योजना कातकरी जमातीतील लोकांना समजू शकल्या नाहीत किंवा त्याचा लाभ त्यांना घेता आलेला दिसून येत नाही. भारताच्या केंद्र व राज्य शासनाने अनेक नवनवीन योजना आदिवासी समाजासाठी सुरु केल्या असल्या तरी त्याचा लाभ घेताना आदिवासी जमातीतील लोक काही प्रमाणात कमी पडत असल्याचे दिसते. शासनाने शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य, जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावर विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे तसेच निमशासकीय संस्था, स्वयंसेवी संस्था यांचीही मदत घेऊन शासनाच्या योजना आदिवासींपर्यंत आणि विशेष करुन कातकरी जमातीपर्यंत पोहोचवल्यास कातक-यांच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा झालेली दिसून येईल.

**संदर्भ :**


- आगलावे प्रदीप, सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, तिसरी आवृत्ती-
- 2010, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर-10, पृष्ठ क्र. 199 ते 200.
- तहसिल कार्यालय, कर्जत तालुका, जि. रायगड.
- https://en.wikipedia.org/wiki/Katkari_people
- https://mr.vikaspedia.in
- https://tribal.maharashtra.gov.in
- https://trti.maharashtra.gov.in
- https://vishwakosh.marathi.gov.in/tag/vol-03/